॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 6 --- SHASHTHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Machchindranath travels south to Adul village in the Konkan region, where he encounters the fierce Goddess Kalika. Seeking to empower his mantra-craft, Machchindra asks her for a spiritual boon, but the Goddess takes offense at his bold approach. A fierce battle breaks out as both unleash powerful divine weapons, shaking the earth with their spiritual might. After a hard-fought contest, Machchindra's yogic mastery prevails, prompting Lord Shiva to intervene personally to calm the Goddess and reconcile the two. Recognizing the master's true divinity, Kalika ultimately blesses his Sabari Vidya and promises lifelong protection to anyone who faithfully recites this chapter. Moving forward with renewed cosmic favor, Machindra meets Shiva's celestial son Veerabhadra before continuing his holy journey toward the sacred shrine of Hareshwar.

Ovee 1

जयजयाजी क्षीराब्धिवासा । शेषशायी कमळहंसा । नभोद्भवशोभा कमळाभासा । सुखविलासा रमेशा ॥ १ ॥

Transliteration

Jaya-jaya-ji Ksheera-Abdhi-Vaasaa | Shesha-Shaayee kamala-hansaa | Nabhodbhava-shobhaa kamalaa-bhaasaa | Sukha-vilaasaa Ramesha ||

Ovee 2

हे करुणानिधे दयावंता । दीनबंधो दीनानाथा । पुढें रसाळ कवित्वकथा । बोलवीं की रसनेसी ॥ २ ॥

Transliteration

Hey karunaa-nidhe Dayaavantaa | Deena-Bandho Deenaa-Naathaa | Pudhe rasaala kavitva kathaa | Bolavee kee rasanesee ||

Ovee 3

मागील अध्यायीं रसाळ कथन । कीं बारामल्हार पवित्र स्थान । तेथे अष्टदैवत पिशाच मिळोन । युद्ध केले नाथासी ॥ ३ ॥

Transliteration

Maageela adhyaayee rasaala kathanu | Kee Baaraa-malhaara pavitra sthaanu | Tethe ashta daivata pishaacha milonu | Yuddha kele naathaasee ||

Ovee 4

यापरी बारामल्हार करुनि तीर्थ । कुमार दैवत करुनि कोकणस्थानांत । कुडाळ प्रांत आडूळ गांवांत । येऊनियां राहिला ॥ ४ ॥

Transliteration

Yaaparee Baaraa-malhaara karuni teerthu | Kumaara daivata karuni Kokana-sthaanaantu | Kudaala praanta Aadoola gaavaantu | Yeuuniyaa raahilaa ||

Ovee 5

तों ग्रामाबाहेर दुर्गालयीं । महाकाळिका दैवत आहे । तयाचे दर्शना लवलाहें । मच्छिंद्रनाथ पै गेला ॥ ५ ॥

Transliteration

Toh graamaa-baahera Durgaa-alayee | Mahaa Kaalikaa daivata aahe | Tayaache darshanaa lavalaahe | Machchindra-Naatha pai gelaa ||

Ovee 6

तें काळिकादैवत अति खडतर । मूर्तिमंत नांदे पृथ्वीवर । तें शिवहस्ताचें काळिकाअस्त्र । स्थापन केलें महीसी ॥ ६ ॥

Transliteration

Tey Kaalikaa daivata ati khadataru | Moortimanta naande prithvee varu | Tey Shiva-hastaace Kaalikaa-astru | Sthaapana kele maheesee ||

Ovee 7

त्या अस्त्रेंकरुनि दैत्य वधिले । म्हणोनि शिवचित्त प्रसन्न झाले । म्हणूनि काळिकादेवी वहिलें । वरदान घेई कां ॥ ७ ॥

Transliteration

Tyaa astrenkaruni Daitya vadhile | Mhanoni Shiva-chitta prasanna jhaale | Mhanuuni Kaalikaa Devee vahile | Varadaana gheee kaa ||

Ovee 8

वेधक कामना असेल चित्तीं । तें वरप्रदान मागें भगवती । येरी म्हणे अपर्णापती । मम कामना ऐकिजे ॥ ८ ॥

Transliteration

Vedhaka kaamanaa asela chittee | Tey vara-pradaana maage Bhagavatee | Yeree mhane Aparnaa-Patee | Mama kaamanaa aikije ||

Ovee 9

तव हस्तीं मी बहुत दिवस । बैसले अस्त्रसंभारास । आणि जेथे धाडिलें त्या कार्यास । सिद्ध करुनि आलें मी ॥ ९ ॥

Transliteration

Tava hastee mee bahuta divasu | Baisale astra-sambhaaraasu | Aani jethe dhaadile tyaa kaaryaasu | Siddha karuni aale mee ||

Ovee 10

बहुत वृक्षांतें भंगितां क्षितीं । मी श्रम पावलें अंबिकाहस्ती । परी मातें विश्रांती । सुखवासा भोगू दे ॥ १० ॥

Transliteration

Bahuta vrikshaante bhangitaa kshitee | Mee shrama paavale Ambikaa-hastee | Paree maate vishraantee | Sukhavaasaa bhogoo de ||

Ovee 11

मग अवश्य म्हणूनि उमारंमण । तेथें केलें तियेचें स्थापन । तें उग्र दैवत अति म्हणोन । अद्यापि आहे कलीमाजीं ॥ ११ ॥

Transliteration

Maga avashya mhanuuni Umaaramanu | Tethe kele tiyeche sthaapanu | Tey ugra daivata ati mhanonu | Adyaapi aahe Kalee-maajee ||

Ovee 1

त्या काळिकादर्शनासाठीं । चित्त व्यग्र होवोनि पोटीं । मार्ग लक्षूनि तयासाठीं । संचार करिता जाहला ॥ १२ ॥

Transliteration

Tyaa Kaalikaa darshanaa saathee | Chitta vyagra hovoni potee | Maarga lakshuuni tayaa saathee | Sanchaara karitaa jaahalaa ||

Ovee 13

देवीप्रती करुनि नमन । म्हणे माय वो आश्चर्यपण । म्यां मंत्रकाव्य केले निपुण । त्याजला साह्य होई तूं ॥ १३ ॥

Transliteration

Devee-pratee karuni namanu | Mhane Maaya vo aashcharya panu | Myaa mantra-kaavya kele nipunu | Tyaajalaa saahya hoee toh ||

Ovee 14

तरी माझें हस्तें विराजून । मम कवित्वविद्या गौरवून । तया ओपूनि वरदान । कार्या उदित होईं कां ॥ १४ ॥

Transliteration

Taree maajhe haste viraajuunu | Mama kavitva vidyaa gauravuunu | Tayaa opuuni varadaanu | Kaaryaa udita hoee kaa ||

Ovee 15

ऐसें मच्छिंद्र बोलतां वाणी । क्षोभ चढला अंतःकरणीं । शिवहस्ते अस्त्रालागोनि । पूर्णाश्रम झालासे ॥ १५ ॥

Transliteration

Aise Machchindra bolataa vaanee | Kshobha chadhalaa antakaranee | Shivahaste astraa-laagoni | Poorna-aashrama jhaalaase ||

Ovee 16

त्यात मच्छिंद्राचें बोलणें । त्या काळिकादेवीनें ऐकून । तेणें क्षोभलें अंतःकरण । प्रळयासमान जेवीं ॥ १६ ॥

Transliteration

Tyaata Machchindraache bolane | Tyaa Kaalikaa Deveene aikuunu | Tene kshobhale antakaranu | Pralayaa-samaana jevee ||

Ovee 17

जैसा मुचकुंद श्रमोनि निद्रिस्त । तैं काळयवन गेला तेथ । निद्रा बिघडतां क्रोधानळांत । प्रसर झाला त्या समयीं ॥ १७ ॥

Transliteration

Jaisaa Muchakunda shramoni nidristu | Tai Kaala-Yavana gelaa tethu | Nidraa bighadataa krodha-analaantu | Prasara jhaalaa tyaa samayee ||

Ovee 18

कीं प्रल्हाद पडतां परम संकटीं । विष्णुहृदयीं क्रोध दाटी । प्रगट झाला कोरडे काष्ठीं । राक्षसालागीं निवटावया ॥ १८ ॥

Transliteration

Kee Pralhaada padataa parama sankatee | Vishnu hridayee krodha daatee | Pragata jhaalaa korade kaashthee | Raakshasaa-laagee nivataavayaa ||

Ovee 19

तैसी काळिकाहृदयसरिता । उचंबळली क्रोधभरिता । मच्छिंद्रालागीं महीसिंधुअर्था । मेळवूं पाहे लगबगें ॥ १९ ॥

Transliteration

Taisee Kaalikaa-hridaya-Saritaa | Uchambalalee krodha-bharitaa | Machchindraa laagee mahee-Sindhu-arthaa | Melavoo paahe lagabage ||

Ovee 20

कीं क्रोध नोहे वडवानळ । मच्छिंद्र अब्धी अपारजळ । प्राशूं पाहे उतावेळ । अर्थसमय जाणूनियां ॥ २० ॥

Transliteration

Kee krodha nohe Vadavaaanalu | Machchindra abdhee apaarajalu | Praashoo paahe utaavelu | Artha-samaya jaanuuniyaa ||

Ovee 21

म्हणे नष्टा अनिष्टा पतिता । मीं भवपाणीं श्रमले असतां । त्यांतचि मातें दुःखवार्ता । शिणवूं पाहसी पुढारा ॥ २१ ॥

Transliteration

Mhane nashtaa anishtaa patitaa | Mee Bhava-Paanee shramale asataa | Tyaantachi maate Dukha-vaartaa | Shidavoo (Shinavoo) paahasee pudhaaraa ||

Ovee 22

तुवां कवित्वविद्या निर्मून । मातें मागसी वरप्रदान । परी वर नोहे मजला विघ्न । करुं आलासी दुर्बुद्धे ॥ २२ ॥

Transliteration

Tuvaa kavitva vidyaa nirmuunu | Maate maagasee vara-pradaanu | Paree vara nohe majalaa vighnu | Karu aalaasee durbuddhe ||

Ovee 23

अरे मी आपला भोग सारुन । निवांत बैसलें सेवीत स्थान । तैं तूं मातें वरा गोंवून । शिणवूं पाहसी दुगत्मया ॥ २३ ॥

Transliteration

Arey mee aapalaa bhoga saarunu | Nivaanta baisale seveeta sthaanu | Tai too maate varaa govuunu | Shinavoo paahasee Duraatmayaa ||

Ovee 24

तरी आतां मम लोचनीं । उभा न राहें जाय फिरोनि । नातरी आगळीक होतां करणी । शासनकाळ लाभसील ॥ २४ ॥

Transliteration

Taree aataa mama lochanee | Ubhaa na raahe jaaya phironi | Naataree aagaleeka hotaa karanee | Shaasana-kaala laabhaseela ||

Ovee 25

मी शिवकरीचे अस्त्र । तव करीं राहीन काय विचित्र । कीं करीं कवळूनि नरोटीपात्र । भिक्षा मागे श्रीमंत ॥ २५ ॥

Transliteration

Mee Shiva karee che astru | Tava karee raaheena kaaya vichitru | Kee karee kavaluuni narotee paatru | Bhikshaa maage shreemantu ||

Ovee 26

किंवा पितळधातूची मुद्रिका रचिली । ते हिराहिरकणी वेढका घडली । तेवी तूतें कामना स्फुरली । सर सर माघारा ॥ २६ ॥

Transliteration

Kivaa pitala-dhaatoocee mudrikaa rachilee | Tey hiraa-hirakanee vedhakaa ghadalee | Tevee toote kaamanaa sphuralee | Sara sara maaghaaraa ||

Ovee 27

कीं वायसाचे धवळारी । हंसबाळ करी चाकरी । तन्न्याये दुराचारी । इच्छूं पाहे मम काष्ठा ॥ २७ ॥

Transliteration

Kee vaayasaache dhavalaaree | Hansabaala karee chaakaree | Tannyaye duraachaaree | Ichchoo paahe mama kaashthaa ||

Ovee 28

राव रंकाचे पंक्ती आला । आला परी श्रेष्ठता त्याला । कीं सिंधूचि कूपस्थानीं ठेला । नांदत कीं आवडीनें ॥ २८ ॥

Transliteration

Raava rankaache panktee aalaa | Aalaa paree shreshthataa tyaalaa | Kee sindhoochi koopa-sthaanee thelaa | Naandata kee aavadeene ||

Ovee 29

की दीपतेजाते पाहूनि वास । दीपतेजातें करी आस । तन्न्याये शक्तिअस्त्रास । तव करीं वसती प्रारब्धें ॥ २९ ॥

Transliteration

Kee deepa-tejaate paahuuni vaasu | Deepa-tejaate karee aasu | Tannyaaye shakti-astraasu | Tava karee vasatee praarabdhe ||

Ovee 30

आला विचारिता पांडित्यपण । तो अजारक्षका पुसेल कोठून । तन्न्यायें मूर्खा जाण । आलासी येथें दुरात्मया ॥ ३० ॥

Transliteration

Aalaa vichaaritaa paandityapanu | Toh ajaa-rakshakaa pusela kothuunu | Tannyaaye moorkhaa jaanu | Aalaasee yethe Duraatmayaa ||

Ovee 31

अहा प्रतापी विनतासुत । क्षीणचिलोट होऊनि मस्त । तयासीं समता करुं पाहत । तेवीं येथें आलासी ॥ ३१ ॥

Transliteration

Ahaa prataapee Vinataa-sutu | Ksheena-chilota houuni mastu | Tayaasee samataa karu paahatu | Tevee yethe aalaasee ||

Ovee 32

अरे मी देव रुद्रकरीं असतां । तव करीं वसूं हें काय भूता । तूतें कांही शंका बोलतां । वाटली नाहीं दुरात्मया ॥ ३२ ॥

Transliteration

Arey mee deva Rudrakaree asataa | Tava karee vasoo hey kaaya Bhootaa | Toote kaanhee shankaa bolataa | Vaatalee naahee duraatmayaa ||

Ovee 33

तरी असो आतां कैसें । येथोनि जाई लपवी मुखास । नातरी जीवित्वा पावसी नाश । पतंग दीपासम जेवीं ॥ ३३ ॥

Transliteration

Taree aso aataa kaise | Yethoni jaaee lapavee mukhaasu | Naataree jeevitvaa paavasee naashu | Patanga deepaa sama jevee ||

Ovee 34

याउपरी मच्छिंद्र म्हणे देवी । पतंग जळे दीपासवीं । परी तैसें नोहे माझे ठायीं । प्रताप पाहीं तरी आतां ॥ ३४ ॥

Transliteration

Yaauparee Machchindra mhane Devee | Patanga jale deepaasavee | Paree taise nohe maajhe thaayee | Prataapa paahee taree aataa ||

Ovee 35

अगे मित्रबिंब तें असें लहान । परी प्रतापतेजें भरे त्रिभुवन । तेवीं तूतें दाखवून । वश्य करीन ये समयीं ॥ ३५ ॥

Transliteration

Aghe mitrabimba tey ase lahaanu | Paree prataapa-teje bhare tribhuvanu | Tevee toote daakhavuunu | Vashya kareena ye samayee ||

Ovee 36

अगे प्रताप जेवीं पंदुसुतांनी । वायुसुतातें श्वेती दावुनी । अक्षयी ध्वजीं बैसवोनी । किर्ति केली महीवरी ॥ ३६ ॥

Transliteration

Aghe prataapa jevee Pandu-Sutaannee | Vaayu-sutaate Shvetee daavunee | Akshayee dhvajee baisavonee | Kirti kelee maheevaree ||

Ovee 37

कीं अरुण मित्रापुढी जोड । तेवीं तूतें दावीन चाड । तरी दत्तपुत्र मी कोड । जगीं मिरवीन ये वेळे ॥ ३७ ॥

Transliteration

Kee Aruna Mitraapudhee jodu | Tevee toote daaveena chaadu | Taree Dattaputra mee kodu | Jagee miraveena ye vele ||

Ovee 38

देवी म्हणे भ्रष्टा परियेसीं । कान फाडुनि तूं आलासी । इतुक्यानें भयातें मज दाविसी । परी मी न भीं सर्वथा ॥ ३८ ॥

Transliteration

Devee mhane bhrashtaa pariyesee | Kaana phaaduni too aalaasee | Itukyaane bhayaate maja daavisee | Paree mee na bhee sarvathaa ||

Ovee 39

हातीं घेऊनि करकंकण । शेंदूर आलासी भाळीं चर्चुन । परी मी न भिईं इतुक्यानें । सर सर परता हे भ्रष्टा ॥ ३९ ॥

Transliteration

Haatee gheuuni kara-kankanu | Shendoora aalaasee bhaalee charchunu | Paree mee na bhiee itukyaane | Sara sara parataa hey bhrashtaa ||

Ovee 40

अरे तुझी उत्पत्ती मज ठाऊक । कीं धीवर जाण तुझा जनक । तरी तूं मत्स्य मीन धरुनि कौतुकें । निर्वाह करी बा उदराचा ॥ ४० ॥

Transliteration

Arey tujhee utpattee maja thaaooku | Kee dheevara jaana tujhaa Janaku | Taree too matsya meena dharuni kautuke | Nirvaaha karee baa udara achaa ||

Ovee 41

तरी तुज अस्त्रविद्या निपुण । कायसा व्हावी दारिद्र्याकारण । कीं अंधाचें जन्मचक्षुलावण्य । सर्वथा उपयोगी दिसेना ॥ ४१ ॥

Transliteration

Taree tuja astravidyaa nipunu | Kaayasaa vhaavee daaridrya-kaaranu | Kee andhaache janma chakshu laavanyu | Sarvathaa upayogee disenaa ||

Ovee 42

कीं बहुरुपी मिरवी शूरपण । तरी तें खेळापुरतें निपुण ॥ ४२ ॥

Transliteration

Kee bahurupee miravee shoorapanu | Taree tey khelapuratee nipunu | Tey dvandvajaala saambhalu saambhaloonu || Vevhaara aavhaanee aapulaa || 42 ||

Ovee 43

अरे मातें दाविसी उग्ररुप । दांभिका ठका महाप्रताप । अहंकृती मनाचें पाप । मनामाजी मिरवी कां ॥ ४३ ॥

Transliteration

Are maate daavisee ugrarupu | Daambhikaa thakaa mahaa prataapu | Ahankritee manaache paapu | Manaamaajee miravee kaa ||

Ovee 44

तूतें वाटेल मी महाथोर । कीं वश्य केलीं भूतें समग्र । तैसा नोहे हा व्यवहार । शिवास्त्र मी असें ॥ ४४ ॥

Transliteration

Toote vaatela mee mahaathoru | Kee vashya kelee Bhoote samagru | Taisaa nohe haa vyavahaaru | Shivaastra mee ase ||

Ovee 45

उगवली दृष्टी करीन वांकुडी । पाडीन ब्रह्मांडांच्या उतरंडी । तेथे मशका तव प्रौढी । किमर्थ व्यर्थ मिरवावी ॥ ४५ ॥

Transliteration

Ugavalee drishtee kareena vaankudee | Paadeena brahmaandaanchyaa utarandee | Tethe mashakaa tava praudhee | Kimartha vyartha miravaavee ||

Ovee 46

अगा मशक धडका हाणी बळें । तरी कां पडेल मंदराचळ । तेवीं तूं मातें घुंगरडें केवळ । निजदृष्टीं आव्हानिसी ॥ ४६ ॥

Transliteration

Agaa mashaka dhadakaa haanee bale | Taree kaa padela Mandaraachalu | Tevee too maate Ghungarade kevalu | Nija-drishtee aavhaanisee ||

Ovee 47

मच्छिंद्र म्हणे देवी ऐक । बळीनें वामन मानिला मशक । परी परिणामीं पाताळलोक । निजदृष्टीं दाविला ॥ ४७ ॥

Transliteration

Machchindra mhane Devee aiku | Baleene Vaamana maanilaa mashaku | Paree parinaamee Paataala-Loku | Nija-drishtee daavilaa ||

Ovee 48

ऐसें ऐकतां भद्रकाळी । चित्तव्यवधान पडिलें क्रोधानळीं । मग प्रतापशिखाज्वाळामाळी । कवळूं पाहे मच्छिंद्रा ॥ ४८ ॥

Transliteration

Aise aikataa Bhadra-Kaalee | Chitta-vyavadhaana padile krodha-analee | Maga prataapa-shikhaa-jvaalaa-maalee | Kavaloo paahe Machchindraa ||

Ovee 49

मग परम क्रोधें त्यासी बोलत । म्हणे कवण प्रताप आहे तूतें । तो मज दावीं मशका येथें । वामनकृत्यें बळी जेवीं ॥ ४९ ॥

Transliteration

Maga parama krodhe tyaasee bolatu | Mhane kavana prataapa aahe toote | Toh maja daavee mashakaa yethe | Vaamana-kritye balee jevee ||

Ovee 50

मच्छिंद्र म्हणे बहु युद्धासी । मिरवलीस शिवकार्यासी । तें मज दावीं अहर्निशी । परीक्षा घेईन मी तुझी ॥ ५० ॥

Transliteration

Machchindra mhane bahu yuddhaasee | Miravaleesa Shiva-kaaryaasee | Tey maja daavee aharnishee | Pareekshaa gheeena mee tujhee ||

Ovee 51

अगा तरु वाढला गगनचुंबित । परी वातशस्त्रें उचंबळत । तेवीं तूतें तोचि पंथ । आज दृष्टी पडेल कीं ॥ ५१ ॥

Transliteration

Agaa taru vaadhalaa gagana-chumbitu | Paree vaata-shastre uchambalatu | Tevee toote tochi panthu | Aaja drishtee padela kee ||

Ovee 52

अगे बहु जिंकिलें समरंगणीं । अभिमाननग वाढविला त्यांनी । परी प्रारब्धयोगें करुनी । छिन्नभिन्न होईल तो ॥ ५२ ॥

Transliteration

Aghe bahu jinkile samara-anganee | Abhimaana-naga vaadhavilaa tyaannee | Paree praarabdha-yoge karunee | Chinna-bhinna hoeela toh ||

Ovee 53

ऐसें ऐकतां भद्रकाळी । देती झाली सिंहा आरोळी । प्रगट होतां अंतराळीं । ब्रह्मांड तेथें उजळले ॥ ५३ ॥

Transliteration

Aise aikataa Bhadra-Kaalee | Detee jhaalee simhaa aarolee | Pragata hotaa antaraalee | Brahmaanda tethe ujalale ||

Ovee 54

शब्द करी अति अचाट । कीं सहस्त्र विजूंचा कडकडाट । कीं अनंत अर्कउदयांत । महीलागीं मिरवला ॥ ५४ ॥

Transliteration

Shabda karee ati achaatu | Kee sahastra vijoonchaa kadakadaatu | Kee ananta arka-udayaantu | Mahee-laagee miravalaa ||

Ovee 55

तें भद्रकाळी अस्त्र पूर्ण । येरी अस्त्र नोहे तें समयप्रदान । कीं देवदानवांचे मरण । महीलागीं मिरवतसे ॥ ५५ ॥

Transliteration

Tey Bhadra-Kaalee astra poornu | Yeree astra nohe tey samaya-pradaanu | Kee deva-daanavaance maranu | Mahee-laagee miravatase ||

Ovee 56

तें अस्त्र नोहे बोलतां वाणी । कीं मायाप्रळयींचा उदित अग्नि । सकळां शांतवूनि शून्यवदनीं । भक्षूनि राहे पंचभूतां ॥ ५६ ॥

Transliteration

Tey astra nohe bolataa vaanee | Kee maayaa-pralayeenchaa udita agni | Sakalaa shaantavuuni shuunya-vadanee | Bhakshuuni raahe pancha-bhootaa ||

Ovee 57

ऐसी ते सकळ पूर्ण । कीं वासवशक्तीची भगिनी दारुण । पाहती उर्ध्वगमन । तेजःपुंज मिरवूनी ॥ ५७ ॥

Transliteration

Aisee tey sakala poornu | Kee Vaasava-shakteecee bhaginee daarunu | Paahatee jhali urdhva-gamanu | Tejapunja miravuunee ||

Ovee 58

जंव शब्द करितां अति अचाट । खचूनि पडती गिरिकपाट । वनचर पळतां न मिळे वाट । ठायीं ठायीं दडताती ॥ ५८ ॥

Transliteration

Java shabda karitaa ati achaatu | Khachuuni padatee giri-kapaatu | Vanachara palataa na mile vaatu | Thaayee thaayee dadataatee ||

Ovee 59

अष्ट दिग्गज अष्ट दिक्पाळ । परम हडबडले शब्द तुंबळ । अति थडथडाट कांपे केवळ । महीलागी मिरवतसे ॥ ५९ ॥

Transliteration

Ashta Diggaja Ashta Dikpaalu | Parama hadabadale shabda tumbalu | Ati thadathadaata kaampe kevalu | Mahee-laagee miravatase ||

Ovee 60

हेलावलें समुद्रजळ । हालावले सप्तपाताळ । मही म्हणे मी रसातळ । पाहीनसे वाटतें ॥ ६० ॥

Transliteration

Helaavale samudrajalu | Haalaavale Sapta-Paataalu | Mahee mhane mee Rasaatalu | Paaheenase vaatate ||

Ovee 61

उरगनाथ सहस्त्रफणी । तोही उचली स्वमूर्धनी । वाहूं पाहे सकळा अवनी । रसातळ भोगातें ॥ ६१ ॥

Transliteration

Uraga-Naatha sahastra-phanee | Tohee uchalee sva-moordhanee | Vaahoo paahe sakalaa avanee | Rasaatala bhogaate ||

Ovee 62

ऐकूनि सबळ गडगडाट । वराह दंत सावरी नेटें । कूर्म पृष्ठी आपुली हाटे । महीलागीं देतसे ॥ ६२ ॥

Transliteration

Aikuuni sabala gadagadaatu | Varaaha danta saavaree nete | Koorma prishthee aapulee haate | Mahee-laagee detase ||

Ovee 63

ऐसें दाही दिशा झालें । मानव दानव सर्व गळाले । विकारा करुनि प्रगट वहिले । महीलागीं मिरवतसे ॥ ६३ ॥

Transliteration

Aise daahee dishaa jhaale | Maanava daanava sarva galaale | Vikaaraa karuni pragata vahile | Mahee-laagee miravatase ||

Ovee 64

सकळ झालिया हडबडाट । देव दचकले स्वर्गपीठ । सोडोनि राहोनि विमाना पेठ । अंतराळीं मिरवती ॥ ६४ ॥

Transliteration

Sakala jhaaliyaa hadabadaatu | Deva dachakale svarga-peethu | Sodoni raahoni vimaanaa pethu | Antaraalee miravatee ||

Ovee 65

अंतराळीं कडकडाट । करितां बोले मच्छिंद्रा नेट । म्हणे घाला येतसे अचाट । जीवित्व रक्षी जोगड्या ॥ ६५ ॥

Transliteration

Antaraalee kadakadaatu | Karitaa bole Machchindraa netu | Mhane ghaalaa yetase achaatu | Jeevitva rakshee jogadyaa ||

Ovee 66

तुवां व्यर्थ केली रळी । आतां महीची होईल रांगोळी । तरी तूं स्वगुरु येणें काळीं । स्मरणातें मिरवीं कां ॥ ६६ ॥

Transliteration

Tuvaa vyartha kelee ralee | Aataa maheechee hoeela raangolee | Taree too svaguru yene kaalee | Smaranaate miravee kaa ||

Ovee 67

अगा जैसें वज्रास्त्रें करुन । बा नगाचे होत चूर्ण । तन्न्यायें तूं महीकारण । क्षीण करिसी जोगड्या ॥ ६७ ॥

Transliteration

Agaa jaise Vajraastre karunu | Nagaache hota choornu | Tannyaaye too mahee kaaranu | Ksheena karisee jogadyaa ||

Ovee 68

अरे हा सकळ महीपाट । तो आज कालिका करी सपाट । तरी आतां काय पाहसी वाट । मिरविसी कैसा जोगड्या ॥ ६८ ॥

Transliteration

Arey haa sakala maheepaatu | Toh aaja Kaalikaa karee sapaatu | Taree aataa kaaya paahasee vaatu | Miravisee kaisaa jogadyaa ||

Ovee 69

कीं धरा सबळ ती आंदोळली । यावरी तळीं भद्रकाळी । तरी मच्छिंद्रधान्याची पिष्टबळी । आतां मिरवीन जोगड्या ॥ ६९ ॥

Transliteration

Kee dharaa sabala tee aandolalee | Yaavaree talee Bhadra-Kaalee | Taree Machchindraa dhaanyaacee pishta-balee | Aataa miraveena jogadyaa ||

Ovee 70

मच्छिंद्र म्हणे बोलसी वाणी । परी ते वृश्चिककंटकाची खाणी । दंश करितां मजलागोनि । त्याला मारीन निश्चयें ॥ ७० ॥

Transliteration

Machchindra mhane bolasee vaanee | Paree tey vrishchika-kantakaacee khaanee | Dansha karitaa majalaagoni | Tyaalaa maareena nishchaye ||

Ovee 71

मग भस्मझोळी कुक्षीपुटी । करीं कवळूनि भस्मचिमुटी । मंत्रअस्त्रातें आणोनि पोटीं । वासवशक्ती जपतसे ॥ ७१ ॥

Transliteration

Maga bhasma-jholee kukshee-putee | Karee kavaluuni bhasma-chimutee | Mantra-astraate aanoni potee | Vaasava-Shaktee japatase ||

Ovee 72

मंत्री पाठ होतां भस्मचिमुटी । फेकिली तेव्हां गगनपंथीं । तंव ती तत्काळ वासवशक्ती । प्रगट झाली तेजस्वी ॥ ७२ ॥

Transliteration

Mantree paatha hotaa bhasma-chimutee | Phekilee tevhaa gagana-panthee | Tava tee tatkaala Vaasava-Shaktee | Pragata jhaalee tejasvee ||

Ovee 73

जैसे सहस्त्र अर्क तेजाळ । कीं उदय पावला भडाग्निगोळ । काळिकाविधान तममंडळ । निरसावया जातसे ॥ ७३ ॥

Transliteration

Jaise sahastra arka tejaalu | Kee udaya paavalaa bhadaa-agni-golu | Kaalikaa-vidhaana tama-mandalu | Nirasaavayaa jaatase ||

Ovee 74

काळिका कनककश्यपूजागी । मानूनि प्रल्हाद मच्छिंद्र जोगी । स्तंभापरी भस्मचिमुटींत वेगीं । नरहरिरुपें प्रगटली ॥ ७४ ॥

Transliteration

Kaalikaa Kanaka-Kashyapoo-jaagee | Maanuuni Pralhaada Machchindra jogee | Stambhaa-paree bhasma-chimuteenta vegee | Narahari-rupe pragatalee ||

Ovee 75

कीं परम क्रोधी वडवानळ । भद्रकाळीं ते समुद्रजळ । प्राशावया उतावेळ । गगनपंथें जातसे ॥ ७५ ॥

Transliteration

Kee parama krodhee Vadavaaanalu | Bhadra-kaalee tey samudrajalu | Praashaavayaa utaavelu | Gagana-panthe jaatase ||

Ovee 76

तें वासवास्त्र अर्क करीचें । भद्रकाळी अस्त्र शिवकरीचें । उभय ते सवार प्रतापनगरीचे । युद्धालागीं मिरवले ॥ ७६ ॥

Transliteration

Tey Vaasava-Astra arka kareeche | Bhadra-Kaalee astra Shiva karee che | Ubhaya tey savaara prataapa-nagareece | Yuddhaa laagee miravale ||

Ovee 77

कीं पाहणी पाहतां हरिहर । कीं एक मित्र एक चंद्र । वाचस्पतीचें माहात्म्य अपार । उशना कवि मिरवीतसे ॥ ७७ ॥

Transliteration

Kee paahanee paahataa Hariharu | Kee eka Mitra eka Chandru | Vaachaspateenche maahaatmya apaaru | Ushanaa kavi miraveetase ||

Ovee 78

कीं एक मेरु एक मांदार । कीं वायु आणि वायुकुमार । तेवीं भद्रकाळी वासवास्त्र । गगनामाजी मिरवती ॥ ७८ ॥

Transliteration

Kee eka Meru eka maandaaru | Kee vaayu aani Vaayu Kumaaru | Tevee Bhadra-Kaalee Vaasava-astru | Gagana-maajee miravatee ||

Ovee 79

कीं जेठियांमाजी जरासंध । तया भिडला भीम प्रसिद्ध । कीं कपीमाजी सुग्रीव द्वंद्व । वालीलागीं भिडतसे ॥ ७९ ॥

Transliteration

Kee jethiyaam-maajee Jaraasanghu | Tayaa bhidalaa bheema prasiddhu | Kee kapee-maajee Sugreeva dvandvu | Vaalee-laagee bhidatase ||

Ovee 80

तन्न्यायें उभय शक्ती । युद्धा मिसळल्या गगनपंथीं । लोंबी झोंबी प्राणरहिती । करुं पाहती एकमेकां ॥ ८० ॥

Transliteration

Tannyaaye ubhaya shaktee | Yuddhaa misalalyaa gagana-panthee | Lombee jhombee praana-rahitee | Karu paahatee ekamekaa ||

Ovee 81

मग तो एकचि दणदणाट । झाला सबळ ब्रह्मांडस्फोट । विमानीं पळविती देवता वाट । चुकारपणीं मिरवतसे ॥ ८१ ॥

Transliteration

Maga toh ekachi danadanaatu | Jhaalaa sabala Brahmaanda-sphotu | Vimaanee palavitee devataa vaatu | Chukaara-panee miravatase ||

Ovee 82

दोन्ही अस्त्रें बळवंत । एकमेकांतें प्रहार करीत । जेणें प्रहारें भयाभीत । दाही दिशा तैं होती ॥ ८२ ॥

Transliteration

Donhee astre balavantu | Ekamekaante prahaara kareetu | Jene prahaare bhaya-bheetu | Daahee dishaa tai hotee ||

Ovee 83

परी ती काळी अस्त्रदैवत । तिणे ग्रासिलें वासवशक्तीतें । मग अति क्रूर होऊनि उन्मत्त । मच्छिंद्रावरी चालिली ॥ ८३ ॥

Transliteration

Paree tee Kaalee astra daivatu | Tine graasile Vaasava-shakteete | Maga ati kroora houuni unmattu | Machchindraa-varee chaalilee ||

Ovee 84

तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । करीं कवळी भस्म चिमुटींत । मग एकादश शस्त्रातें । रुद्रमंत्र प्रयोगीं स्मरतसे ॥ ८४ ॥

Transliteration

Tey paahuuni Machchindra-Naathu | Karee kavalee bhasma chimuteentu | Maga ekaadasha shastraate | Rudramantra prayogee smaratase ||

Ovee 85

जेणेंकरुनि एकादश रुद्र । प्रगट झाले महाभद्र । तेजःपुंज नक्षत्रचंद्र । काळिकास्त्र मिरवले ॥ ८५ ॥

Transliteration

Jenenkaruni Ekaadasha Rudru | Pragata jhaale mahaa-Bhadru | Tejapunja nakshatra-chandru | Kaalikaa-astra miravale ||

Ovee 86

तें महाप्रळयाकार । भयंकररुपी अनिवार । तें पाहताचि काळिकास्त्र । सूक्तीलागी प्रवर्तली ॥ ८६ ॥

Transliteration

Tey mahaa-pralayaa-kaaru | Bhayankara-rupee anivaaru | Tey paahataachi Kaalikaa-astru | Sooktee-laagee pravartalee ||

Ovee 87

सकळां करुनि नमनानमन । स्तुतीस वाडोनि खणूनि रत्न । परम भक्ती सूक्तीचें कारण । श्रृंगारिलें रुद्रातें ॥ ८७ ॥

Transliteration

Sakalaa karuni namanaa namanu | Stuteesa vaadoni khanuuni ratnu | Parama bhaktee sookteeche kaaranu | Shrringaarile Rudraate ||

Ovee 88

तें नवरत्नांचा सुगम श्रृंगार । भूषणीं मिरवितां एकादश रुद्र । शांत होऊनि महाभद्र । ऐलरुपी पावले ॥ ८८ ॥

Transliteration

Tey nava-ratnaanchaa sugama shrringaaru | Bhooshanee miravitaa Ekaadasha Rudru | Shaanta houuni Mahaa-Bhadru | Ailarupee paavale ||

Ovee 89

तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । वज्रास्त्र त्वरें प्रेरित । तया साह्य धूमास्त्र । महान्त तेवी मिरवतसे ॥ ८९ ॥

Transliteration

Tey paahuuni Machchindra-Naathu | Vajra-astra tvare preritu | Tayaa saahya dhooma-astru | Mahaanta tevee miravatase ||

Ovee 90

तेणें करुनि धुमधुमाकार । मावळला मित्र तारा चंद्र । तया संधींत वज्रास्त्र । निजमस्तकीं भेदीतसे ॥ ९० ॥

Transliteration

Tene karuni dhuma-dhumaa-kaaru | Maavalalaa Mitra taaraa Chandru | Tayaa sandheenta vajraastru | Nija-mastakee bhedeetase ||

Ovee 91

परी ती चपळ काळिका देवी । वज्रास्त्र धरिलें तिनें पायीं । आपटिती झाली शैलाद्रिमहीं । उत्तरदिशे कारणें ॥ ९१ ॥

Transliteration

Paree tee chapala Kaalikaa Devee | Vajra-astra dharile tine paayee | Aapatitee jhaalee Shailaadri mahee | Uttara-dishe kaarane ||

Ovee 92

तेणें धायें शैलाद्रि पर्वत । निमा चूर झाला नेमस्त । ती साक्ष अद्यापि हिंदुस्थानांत । सह्याद्रि पर्वत नसेचि ॥ ९२ ॥

Transliteration

Tene dhaaye Shailaadri parvatu | Nimaa choora jhaalaa nemastu | Tee saaksha adyaapi Hindusthaanaantu | Sahyaadri parvata nasechee ||

Ovee 93

रामेश्वरापासूनि नेमस्त । आणि गुर्जरदेशपर्यंत । महाद्री आहे नांदत । पैल नसे महाराजा ॥ ९३ ॥

Transliteration

Raameshvaraa-paasuuni nemastu | Aani Gurjara desha paryantu | Mahaadree aahe naandatu | Paila nase Mahaaraajaa ||

Ovee 94

असो ऐसें वज्रास्त्र सरलें । आणि धूम्रास्त्र तें गिळिलें । तें पाहूनि मच्छिंद्र वहिलें । वाताकर्षण जपतसे ॥ ९४ ॥

Transliteration

Aso aise Vajra-astra sarale | Aani dhoomra-astra tey gilile | Tey paahuuni Machchindra vahile | Vaataa-karshana japatase ||

Ovee 95

तें सबळ वाताकर्षण । लाभलें होतें मच्छिंद्राकारणें । जे शुक्रमंत्रप्रदान । संजीवनी लाधली ॥ ९५ ॥

Transliteration

Tey sabala vaataa karshanu | Laabhale hote Machchindra kaarane | Je Shukra-mantra-pradaanu | Sanjeevanee laadhalee ||

Ovee 96

कीं वसिष्ठा धेनु झाला लाभ । कीं तें विष्णूचें सुदर्शन । मिळालें स्वयंभ । तेवीं देत सूक्तिकागर्भ सूक्तास्त्र मिळालें ॥ ९६ ॥

Transliteration

Kee Vasishthaa dhenu jhaalaa laabhu | Kee tey Vishnoo che Sudarshanu | Milaale svayambhu | Tevee deta sooktikaa-garbha sookta-astra milaale ||

Ovee 97

कीं यमालागीं यमन साधलें । कीं दमालागीं दमन लाधलें । तेवीं युक्ती मच्छिंद्र शोभले । देत सूक्तिकारत्न मिरवलें ॥ ९७ ॥

Transliteration

Kee Yamaa-laagee yamana saadhale | Kee damaalaagee damana laadhale | Tevee yuktee Machchindra shobhale | Deta sooktikaa-ratna miravale ||

Ovee 98
कीं वज्रास्त्रें शक्र विराजमान । कीं देवता लाधलें अमृतपान । तेवीं दत्तानें सूक्तिकारत्न । मच्छिंद्रातें मिरविलें ॥ ९८ ॥

Transliteration
Kee vajraastre Shakra viraajamaanu | Kee devataa laadhale amrita-paanu | Tevee Dattaane sooktikaa-ratnu | Machchindraate miravile ||

Ovee 99
रत्नांत मंत्रावळी । देत कृपेची वरदावाळी । भस्मचिमुटी योजूनि ते काळीं । प्रोक्षिता झाला मच्छिंद्र ॥ ९९ ॥

Transliteration
Ratnaanta mantra-aavalee | Deta kripechee varada-aavaalee | Bhasma-chimutee yojuuni tey kaalee | Prokshitaa jhaalaa Machchindru ||

Ovee 100
तंव तें मंत्रास्त्र गुप्त । काळिका देवीवर वाहात । प्रवेश होताचि वात कुंठित । सकळ देहाचा पै झाला ॥ १०० ॥

Transliteration
Tava tey mantraastra guptu | Kaalikaa Devee vara vaahaatu | Pravesha hotaachi vaata kunthitu | Sakala dehaachaa pai jhaalaa ||

Ovee 101
तेणें देवी विकळ झाली । गगनाहूनि आदळली । तेणें घायें अति व्यापिली । केवील दिसे मूर्छेनें ॥ १०१ ॥

Transliteration
Tene Devee vikala jhaalee | Gagana-aahuuni aadalalee | Tene ghaaye ati vyaapilee | Keveela dise moorchene ||

Ovee 102
परी महीं पडतां ऐसें वाटलें । कीं मेरुमांदार कोसळले । तेणें प्रहारें पर्वत भंगले । तरु झाले रांगोळी ॥ १०२ ॥

Transliteration
Paree mahee padataa aise vaatale | Kee Meru maandaara Kosalale | Tene prahaare parvata Bhangale | Taru jhaale raangolee ||

Ovee 103
कित्येक सावजें झालीं पूर्ण । कांहीं पळतां रानोरान । दचका पावती समुच्चयें जन । देव दानव विस्मित ॥ १०३ ॥

Transliteration
Kityeka saavaje jhaalee choornu (poornu) | Kaanhee palataa raano-raanu | Dachakaa paavatee samuchchaye janu | Deva daanava vismita ||

Ovee 104

असो ती आवरण अवस्था । महीं निचेष्टित झाली माता । श्वेत नयनीं विकळ देहस्था । अवस्थेंत मिरवली ॥ १०४ ॥

Transliteration

Aso tee aavarana avasthaa | Mahee nicheshtita jhaalee maataa | Shveta nayanee vikala dehasthaa | Avasthenta miravalee ||

Ovee 105

प्राणरहित होऊं पाहे । मग वेगी स्मरला उमाराय । ते वाग्भाट धावोनी तरुणोपाय । जाऊनि पोंचले कैलासा ॥ १०५ ॥

Transliteration

Praana-rahita hooo paahe | Maga vegee smaralaa Umaaraayu | Tey vaagbhaata dhaavonee taruna-upaayu | Jaauuni ponchale Kailaasaa ||

Ovee 106

जातांचि श्रवणद्वारीं बोभाट । सावध होय कैलासनाथ । कीं शिवकरींचें काळिकास्त्र अचाट । संकटांत पडियेलें ॥ १०६ ॥

Transliteration

Jaataanchi shravana-dvaaree bobhaatu | Saavadha hoya Kailaasa Naathu | Kee Shiva-kareence Kaalikaa-astra achaatu | Sankata-anta padiyele ||

Ovee 107

तो हृदयीं पाहे विचारुन । मच्छिंद्रनाथाचे झाले आगमन । मग नंदिकेश्वरीं सिद्ध होऊन । तया ठायीं पातला ॥ १०७ ॥

Transliteration

Toh hridayee paahe vichaarunu | Machchindra-Naathaa che jhaale aagamanu | Maga Nandi-Keshvaree siddha houuni | Tayaa thaayee paatalaa ||

Ovee 108

येताचि देखे मच्छिंद्रनाथ । धावूनि लगबगीं अति त्वरित । चरणकमळीं कामनातीत । मूर्धकमळ अर्पीतसे ॥ १०८ ॥

Transliteration

Yetaachi dekhe Machchindra-Naathu | Dhaavuuni lagabagee ati tvaritu | Charana-kamalee kaamanaa-teetu | Moordha-kamala arpeetase ||

Ovee 109

शिव उतरुनि नंदिकेश्वरीं । भाउकें कवळिला दशमकरी । भेटूनि हृदय प्रेमलहरी । आवळूनि धरितसे ॥ १०९ ॥

Transliteration

Shiva utaruni Nandi-Keshvaree | Bhaauke kavalilaa dashama-karee | Bhetuuni hridaya prema-laharee | Aavaluuni dharitase ||

Ovee 110

म्हणे तान्हुल्या अति थोर । करुनि दाविला चमत्कार । मजकरींचे काळिकास्त्र । आजि जिंकिले पराक्रमें ॥ ११० ॥

Transliteration

Mhane taanhulyaa ati thoru | Karuni daavilaa chamatkaaru | Maja-kareenche Kaalikaa-astru | Aaji jinkile paraakrame ||

Ovee 111

नाथ म्हणे आदिनाथा । हीत्वत्कृपेची बोधसरिता । बद्रिकाश्रमीं राहूनि दत्ता । श्रुत केलें तुम्ही माते ॥ १११ ॥

Transliteration

Naatha mhane Aadi-Naathaa | Hee-tvat-kripechee bodha-Saritaa | Badrikaa-Aashramee raahuuni Dattaa | Shruta kele tumhee maate ||

Ovee 112

षण्मास महाराजा रक्षूनि मातें । प्रसन्न रवि केला तुम्हीं दत्त । त्या प्रसन्न कुळाचें उदित । मातें ओपिलें कृपेनें ॥ ११२ ॥

Transliteration

Shanmaasa Mahaaraajaa rakshuuni maate | Prasanna ravi kelaa tumhee Dattu | Tyaa prasanna kulaache uditu | Maate opile kripene ||

Ovee 113

शिव म्हणे बा अस्तु आतां । सावध करीं काळिकादैवता । नाथ म्हणे वरदहस्ता । मम मौळी स्पर्शावा ॥ ११३ ॥

Transliteration

Shiva mhane baa astu aataa | Saavadha karee Kaalikaa-daivataa | Naatha mhane varada-hastaa | Mama maulee sparshaavaa ||

Ovee 114

माझें मागणें आहे किंचित । देऊनि स्वामीनीं करावें श्रुत । जैसा संजीवनीचे अर्थ । शुक्र कचा फळला असे ॥ ११४ ॥

Transliteration

Maajhe maagane aahe kinchitu | Deuuni svaameenee karaave shrutu | Jaisaa Sanjeevanee che arthu | Shukra kachaa phalalaa ase ||

Ovee 115

मग सिद्ध सर्वेश वरदमौळी । म्हणे कोण कामना उचित झाली । तदनुअर्थ ये काळीं । लाधसी तूं वद वत्सा ॥ ११५ ॥

Transliteration

Maga siddha sarvesha varada-maulee | Mhane kona kaamanaa uchita jhaalee | Tadanuartha ye kaalee | Laadhasee too vada vatsaa ||

Ovee 116

नाथ म्हणे पंचवक्त्रा । कवित्व करविलें साबरी पवित्रा । त्यातें वर देऊनि वरदपात्रा । काळिकास्त्र मिरवावें ॥ ११६ ॥

Transliteration

Naatha mhane Pancha-Vaktraa | Kavitva karavile saabaree pavitraa | Tyaate vara deuuni varada-paatraa | Kaalikaa-astra miravaave ||

Ovee 117

जैसे तव करी बहुदिवस । बसूनि अमित केलें कार्यास । तेवीं माझे वक्त्रास । काळिकेनें बसावें ॥ ११७ ॥

Transliteration

Jaise tava karee bahudivasu | Basuuni amita kele kaaryaasu | Tevee maajhe vaktraasu | Kaalikene basaave ||

Ovee 118

जें जें कार्य लागे मातें । तदनुकार्य वाहावें सरतें । आणि पुढेही मंत्रकार्यातें । उपयोग व्हावें जयासी ॥ ११८ ॥

Transliteration

Je je kaarya laage maate | Tadanu kaarya vaahaave sarate | Aani pudhehee mantra-kaaryaate | Upayoga vhaave jayaasee ||

Ovee 119

ऐसें ये रीतीं वरदान । द्याल जरी प्रसन्न होऊन । तरी कामनासमाधान । निजदेही नांदेल ॥ ११९ ॥

Transliteration

Aise ye reetee varadaanu | Dyaala jaree prasanna houunu | Taree kaamanaa-samaadhaanu | Nijadehee naandela ||

Ovee 120

अवश्य म्हणूनि उमारमण । काळिका त्वत्करीं ओपिन । परी या समयीं जीवित्वदान । कालिकेतें स्वीकारीं ॥ १२० ॥

Transliteration

Avashya mhanuuni Umaaramanu | Kaalikaa tvatkaree opinu | Paree yaa samayee jeevitva daanu | Kaalikete sveekaaree ||

Ovee 121

यापरी मीही उमानाथ । त्वत्कार्यासी आहे उदित । ऐसें म्हणोनि करतळीं त्वरित । भाष घेतली मच्छिंद्रे ॥ १२१ ॥

Transliteration

Yaaparee meehee Umaanaathu | Tvat-kaaryaasee aahe uditu | Aise mhanoni karatalee tvaritu | Bhaasha ghetalee Machchindre ||

Ovee 122

मग चरणीं माथा ठेवूनी । भस्मचिमुटी घेऊनि । वातास्त्रमंत्रआकर्षण जपोनी । बोलतसे वैखरी ॥ १२२ ॥

Transliteration

Maga charanee maathaa thevuunee | Bhasma-chimutee gheuuni | Vaata astramantra aakarshana japonee | Bolatase Vaikharee ||

Ovee 123

पूर्णपाठ वैखरीसी होता । भस्मचिमुटी फेंकी तत्त्वतां । तेणें हृदगत होऊनि सर्वथा । काळिकादेवी उठली ॥ १२३ ॥

Transliteration

Poorna paatha vaikhareesee hotaa | Bhasma-chimutee phenkee tattvataa | Tene hridagata houuni sarvathaa | Kaalikaa Devee uthalee ||

Ovee 124

उठूनि बैसली सावध होऊनी । दाही दिशा पाहे न्याहाळूनी । तों अकस्मात शूळपाणी । आपुले दृष्टीं देखिला ॥ १२४ ॥

Transliteration

Uthuuni baisalee saavadha houunee | Daahee dishaa paahe nyaahaaluunee | Toh akasmaata Shoola-Paanee | Aapule drishtee dekhilaa ||

Ovee 125

मग लगबगें येऊनि त्वरित । शिवपदी मौळी सज्ज करीत । म्हणे महाराजा आदिनाथ । आजि जीवित्व त्वां दिधलें ॥ १२५ ॥

Transliteration

Maga lagabage yeuuni tvaritu | Shivapadee maulee sajja kareetu | Mhane Mahaaraajaa Aadinaathu | Aaji jeevitva tvaa didhale ||

Ovee 126

जैसे होय सर्पसत्रास । तोही मिरविला आस्तिक त्यास । तेवी आज मम प्राणांस । रक्षिता झालासी आदिनाथा ॥ १२६ ॥

Transliteration

Jaise hoya sarpa-satraasu | Tohee miravilaa aastika tyaasu | Tevee aaja mama praanaansu | Rakshitaa jhaalaasee Aadi-Naathaa ||

Ovee 127

कीं भस्मासुराच्या पवनवातीं । आपण पडिलां होतां व्यावृत्ती । तेथे रक्षणें विष्णुमूर्ती । कृपापात्रीं मिरविली ॥ १२७ ॥

Transliteration

Kee Bhasma-Asuraacyaa pavana-vaatee | Aapana padilaa hotaa vyaavrittee | Tethe rakshane Vishnu-Moortee | Kripaa-paatree miravilee ||

Ovee 128

कीं शक्तिघातें सुमित्रासुत । पुढे होतां रघुनाथ । विकट होता हनुमंत । प्रसन्न त्यातें झालासे ॥ १२८ ॥

Transliteration

Kee shakti-ghaate Sumitraa-sutu | Pudhe hotaa Raghu-Naathu | Vikata hotaa Hanumantu | Prasanna tyaate jhaalaase ||

Ovee 129

कीं प्रल्हादाच्या कैवारासी । नरहरी धावलां अति उद्देशीं । तन्न्यायें आज तूं मजपाशीं । मिरवलासी कीं कृपेनें ॥ १२९ ॥

Transliteration

Kee Pralhaadaachyaa kaivaaraasee | Naraharee dhaavalaa ati uddeshee | Tannyaaye aaja too majapaashee | Miravalaasee kee kripene ||

Ovee 130

ऐसें म्हणोनि काळिकादेवी । वारंवार लागे पायीं । याउपरी म्हणे दक्षजांवई । मम मागणें आहे एक ॥ १३० ॥

Transliteration

Aise mhanoni Kaalikaa Devee | Vaaranvaara laage paayee | Yaa-uparee mhane Daksha Jaavaee | Mama maagane aahe eka ||

Ovee 131

देशील जरी कृपा करुन । तरी तुज देईन नागरत्न । देवी म्हणे उमारमण । अर्थ कोणता बोलवा ॥ १३१ ॥

Transliteration

Desheela jaree kripaa karunu | Taree tuja deeena naagaratnu | Devee mhane Umaaramanu | Artha konataa bolavaa ||

Ovee 132

शिव म्हणे बहु दिवस । मम करीं विराजलीस । आतां येऊनि मच्छिंद्रदास । जगउपकारीं बसावें ॥ १३२ ॥

Transliteration

Shiva mhane bahu divasu | Mama karee viraajaleesu | Aataa yeuuni Machchindra daasu | Jaga-upakaaree basaave ||

Ovee 133

हेंचि मागणें माझें आहे । तुवां कृपा करुनि मज द्यावें । हें वचन ऐकूनि महामाय । गदगदां हांसिन्नली ॥ १३३ ॥

Transliteration

Henchi maagane maajhe aahe | Tuvaa kripaa karuni maja dyaave | Hey vachana aikuuni Mahaamaayu | Gadagadaa haansinnalee ||

Ovee 134

म्हणे महाराजा पायांपाशीं । मी म्हणवितें तुमची दासी । इतुकें गुह्य धरोनि मानसीं । दान मागतां हें काय ॥ १३४ ॥

Transliteration

Mhane Mahaaraajaa paayaam-paashee | Mee mhanavite tumachee daasee | Ituke guhya dharoni maanasee | Daana maagataa hey kaaya ||

Ovee 135

जिकडे धाडाल तिकडे जाईन । तुमची आज्ञा मज प्रमाण । इतुकें गुह्य धरोन । दान म्हणणें अनुचित हें ॥ १३५ ॥

Transliteration

Jikade dhaadaala tikade jaaeenu | Tumachee aajnyaa maja pramaanu | Ituke guhya dharonu | Daana mhanane anuchita hey ||

Ovee 136

जैसा वाचस्पती ज्ञानचाड । अजारक्षका पुसे कोड । तन्न्याये माझिया पाड । जल्पसी कीं महाराजा ॥ १३६ ॥

Transliteration

Jaisaa Vaachaspatee jnyaana-chaadu | Ajaa-rakshakaa puse kodu | Tannyaaye maajhiyaa paadu | Jalpasee kee Mahaaraajaa ||

Ovee 137

कीं उड्डाण करावया अर्थी । गोलांगुळा स्तवी मारुती । तन्न्यायें मम प्रयुक्तीं । जल्पतां कीं महाराजा ॥ १३७ ॥

Transliteration

Kee uddaana karaavayaa arthee | Golaangulaa stavee Maarutee | Tannyaaye mama prayuktee | Jalpataa kee Mahaaraajaa ||

Ovee 138

कीं पीयुष मृत्यु निवारणास । स्तविता झाला बळीरस । कीं टक्याकरितां महापरिस । विनवीतसे धनाढ्याला ॥ १३८ ॥

Transliteration

Kee peeyusha mrityu nivaaranaasu | Stavitaa jhaalaa baleerasu | Kee takyaa-karitaa mahaa-parisu | Vinaveetase dhanaadhyaalaa ||

Ovee 139

तन्न्याय अपर्णापती । गौप्य धरुनि करितां विनंती । परी हें श्लाघ्य सेवकाप्रती । कदाकाळीं साजेना ॥ १३९ ॥

Transliteration

Tannyaaya Aparnaa-Patee | Gaupya dharuni karitaa vinantee | Paree hey shlaaghya sevakaa-pratee | Kadaa-kaalee saajenaa ||

Ovee 140

तरी आतां असो ऐसें । मान्य करीन स्वामिशब्दांस । मग मच्छिंद्रास । जननी हृदयीं कवळिला ॥ १४० ॥

Transliteration

Taree aataa aso aise | Maanya kareena svaami-shabdaansu | Maga bolaavooni Machchindraasu | Jananee hridayee kavalilaa ||

Ovee 141

म्हणे बा रे ऐक वचन । साबरीविद्या कविरत्न । जेथे येईल माझें नाम । तेथें साह्य मी असे ॥ १४१ ॥

Transliteration

Mhane baa re aika vachanu | Saabaree Vidyaa kaviratnu | Jethe yeeela maajhe naamu | Tethe saahya mee ase ||

Ovee 142

कवण अर्थी असो कैसें । मी प्रवर्तवूनि उच्चारास । ऐसे करतल देऊनि भाष्य । समाधानीं मिरवले ॥ १४२ ॥

Transliteration

Kavana arthee aso kaise | Mee pravartavuuni uchchaaraasu | Aise karatala deuuni bhaashyu | Samaadhaanee miravale ||

Ovee 143

मच्छिंद्र आणि उमानाथ । देवीनें ठेवूनि तीन रात्र । मग स्नेहसंपन्न बोल बोलत । मच्छिंद्रनाथा ओडविलें ॥ १४३ ॥

Transliteration

Machchindra aani Umaanaathu | Deveene thevuuni teena raatru | Maga sneha-sampanna bola bolatu | Machchindra-Naathaa odavile ||

Ovee 144

याउपरी शिवें देवीचा पाणी । मच्छिंद्रनाथाच्या कृपें ओपूनी । अति गौरवें शूलपाणी । स्वस्थानासी जातसे ॥ १४४ ॥

Transliteration

Yaauparee Shive deveechaa paanee | Machchindra-Naathaa chyaa kripe opuunee | Ati gaurave shoola-paanee | Svasthaanaasee jaatase ||

Ovee 145

मग मच्छिंद्र आणि उमानाथ । देवी बोळवूनि स्वस्थाना येत । शिव पावले कैलासांत । मच्छिंद्रनाथा भेटूनी ॥ १४५ ॥

Transliteration

Maga Machchindra aani Umaanaathu | Devee bolavuuni svasthaanaa yetu | Shiva paavale Kailaasa antu | Machchindra-Naathaa bhetuunee ||

Ovee 146

यापरी तेथूनि मच्छिंद्रनाथ । उत्तरपंथें गमन करीत । तो समुद्रतीरीं हरेश्वर दैवत । गदातीर्थी पातला ॥ १४६ ॥

Transliteration

Yaaparee tethuuni Machchindra-Naathu | Uttara-panthe gamana kareetu | Toh samudra-teeree Hareshvara daivatu | Gadaa-teerthee paatalaa ||

Ovee 147

गदातीर्थी करुनि स्नान । येत हरेश्वरा दर्शनकारणें । ते कथा वर्तेल रसाळ पूर्ण । पुढिले अध्यायीं वदूं आतां ॥ १४७ ॥

Transliteration

Gadaa-teerthee karuni snaanu | Yeta Hareshvaraa darshana kaarane | Tey kathaa vartela rasaala poornu | Pudhile adhyaayee vadoo aataa ||

Ovee 148

शिवसुत वीरभद्र । महाजेठी प्रतापरुद्र । तयातें भेटता नाथ मच्छिंद्र । समरंगणीं मिरवती ॥ १४८ ॥

Transliteration

Shivasuta Veera-Bhadru | Mahaa-jethee prataapa Rudru | Tayaate bhetataa Naatha Machchindru | Samara-anganee miravatee ||

Ovee 149

असो येऊनि त्या प्रसंगीं आतां । भावें पूजिली काळिका देवता । तरी पठणीं प्रसंग उपयोग बहुतां । मुष्टिनिवारणी पडेल ॥ १४९ ॥

Transliteration

Aso yeuuni tyaa prasangee aataa | Bhaave poojilee Kaalikaa devataa | Taree pathanee prasanga upayoga bahutaa | Mushtinivaa ranee padela ||

Ovee 150

पुढें मंत्रपुष्टी दृष्टी । बाधा न करी तीर्थाचिया पाठीं । कुडेचेडेजारणा लोटीं । मरणभीती बाधेना ॥ १५० ॥

Transliteration

Pudhe mantra-pushtee drishtee | Baadhaa na karee teerthaachiyaa paathee | Kude-chede-jaaranaa lotee | Marana bhee tee baadhenaa ||

Ovee 151

हा अध्याय नित्य पठण करील । तो इतुक्या भयापासूनि सुटेल । आणि हा अध्याय गृहीं पाळील । कधींही पीडा त्यासी न होय ॥ १५१ ॥

Transliteration

Haa adhyaaya nitya pathana kareelu | Toh itukyaa bhayaa-paasuuni sutelu | Aani haa adhyaaya grihee paaleelu | Kadheenhee peedaa tyaasee na hoya ||

Ovee 152

आणि कोणासही जगा आंतौता । काळीमुष्टीची बाधा होतां । त्यांतें प्रसंग श्रवणी पडतां । शम होईल ती मुष्टी ॥ १५२ ॥

Transliteration

Aani konaasahee jagaa aantautaa | Kaalee-mushteecee baadhaa hotaa | Tyaante prasanga shravanee padataa | Shama hoeela tee mushtee ||

Ovee 153

ऐसे गोरक्षाचें कथन । वदला आहे किमयागिरी ग्रंथाकारण । तरी जन हो विश्वास धरुन । ग्रंथ संग्रही पाळावा ॥ १५३ ॥

Transliteration

Aise Gorakshaache kathanu | Vadalaa aahe Kimayaa-Giree granthaa kaaranu | Taree jana ho vishvaasa dharunu | Grantha sangrahee paalaavaa ||

Ovee 154

हा ग्रंथ म्हणाल उगलीच वाणी । तरी नोहे आहें अमृतसंजीवनी । पहा सिद्धाची वाग्वाणी । श्रीगोरक्षें कथियेली ॥ १५४ ॥

Transliteration

Haa grantha mhanaala ugaleecha vaanee | Taree nohe aahe amrita-sanjeevanee | Pahaa siddha achee vaagvaanee | Shree-Gorakshe kathiyelee ||

Ovee 155

तरी विश्वास धरुनि चित्ता । प्रचीत घ्यावी पठण करितां । नाहींतरी ग्रंथ उगाचि निंदितां । दोषामाजी पडाल कीं ॥ १५५ ॥

Transliteration

Taree vishvaasa dharuni chittaa | Pracheeta ghyaavee pathana karitaa | Naaheentaree grantha ugaachi ninditaa | Doshaamaajee padaala kee ||

Ovee 156

याउपरी अर्थाअर्थी । उगेचि निंदाल ग्रंथाप्रती । तयाचा निर्वंश पावूनि क्षितीं । यमपुरीं वसे तो ॥ १५६ ॥

Transliteration

Yaa-uparee arthaa arthee | Ugechi nindaala granthaa pratee | Tayaachaa nirvansha paavuuni kshitee | Yamapuree vase toh ||

Ovee 157

तरी भाविक जन । तुम्हां सांगतों एकचि वचन । भावविश्वासा करा रोहण । सकळ स्वार्थ पुरेल कीं ॥ १५७ ॥

Transliteration

Taree Shrote bhaavika janu || Tumhaa saangato ekachi vachanu || Bhaava-vishvaasaa karaa ruhaanu || Sakala svaartha purela kee ||

Ovee 158

जे विश्वासवर स्वार झाले । ते सर्वस्वीं तरुनि गेले । सत्यवचनीं जगीं मिरवले । संतवदनीं विश्वासुक ॥ १५८ ॥

Transliteration

Je vishvaasa vara svaara jhaale | Tey sarvasvee taruni gele | Satya-vachanee jagee miravale | Santa-vadanee vishvaasuka ||

Ovee 159

तरी जगामाजी धुंडीसुत । मालू नरहरीच्या वंशांत । विश्वासें झाला ब्रह्मीं व्यक्त । संतपदीं भावार्थ ॥ १५९ ॥

Transliteration

Taree jagaa-maajee Dhundee-Sutu | Maaloo Naraharee chyaa vanshaantu | Vishvaase jhaalaa Brahmee vyaktu | Santapadee bhaava-artha ||

Ovee 160

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । षष्ठाध्याय गोड हा ॥ १६० ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha Kaavya kimayaa gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Shashtha Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार षष्ठाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Shashtha Sampurnah